**CNR No.MHSI010005072026**

**अटकपुर्व जामीन अर्ज क्र. ९६/२०२६ ( महाराष्ट्र शासन वि.संदिप गणपत तानवडे व.२ ) मधील नि.०१ वरील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२१(१), १३२, ३५२(२), सह ३(५) आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम २०१० चे कलम ४ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयांच्या कथित कृत्यांसाठी वैभववाडी येथील पोलीस स्टेशनमध्ये नोंदविलेल्या गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ मध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम ४८२(१) अन्वये अटकपुर्व जामिन मिळणेसाठी दाखल करणेत आलेला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदारांविरुध्द वैभववाडी पोलीस ठाणे येथे दि.२७/०४/२०२६ रोजी सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम २०१० चे कलम ४ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२१(१),१३२,३५२,३(५) गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ दाखल करणेत आलेला आहे. सदरचा गुन्हा अर्जदार यांचेविरुध्द खोटा व खोडसाळ दाखल केलेला आहे. अर्जदार यांचा गुन्हयात कोणताही सहभाग नाही. अर्जदार यांची गांव मौजे कोकीसरे–नारकरवाडी येथे स्थावर व जंगम मालमत्ता आहे. अर्जदार यांचा गुन्हयाशी काडीमात्रही संबंध नाही. त्यांना नाहक या गुन्हयात खोडसाळरित्या अडकविण्यात आले आहे. अर्जदार यांना अटक करण्याचे कोणतेच कारण नाही. तसेच अर्जदार यांचेकडून कोणतीही जप्त करावयची नाही. अर्जदार वयोवृध्द असून त्यांना हदयविकार व उच्च मधुमेहाचा त्रास आहे. अर्जदार यांचेबसबत कसेध्सतीही गुन्हेगारी पाश्वभूमी नाही. त्यामुळे अर्जदार यांना अंतरिम अटकपुर्व जामीन मंजूर करणेत यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. सरकारपक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.१२ येथे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणणेनुसार सदर गुन्हयाचे तपासाअंती आरोपी विरुध्द प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कणकवली यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले आहे. तसेच तपासी अंमलदार यांनी नि.क्र.१३ येथे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणणेनुसार गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. तसेच जामीन मंजूर झाल्यास गुन्हयातील फिर्यादी, साक्षीदार व इतर संबंधित व्यक्तींवर दबाव टाकून पुराव्यामध्ये हस्तक्षेप करु शकतात. तसेच तपासात अडथळा निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोपीविरुध्द प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कणकवली यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. अभियोग पक्षातर्फे विद्वान अति.सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.राणे आणि आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. यु.एस.सावंत यांचा युक्तिवाद ऐकला.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले, आरोपीविरुध्द वैभववाडी पोलीस ठाणे येथे दि.२७/०४/२०२६ रोजी सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम २०१० चे कलम ४ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२१(१),१३२,३५२,३(५) गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ दाखल करणेत आलेला आहे. गुन्हयाचे तपासकाम पुर्ण होवून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणेत आले आहे. तसेच आरोपींना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता– २०२३ अन्वये कलम ३५(३)(१) अन्वये नोटीस बजावून काही अटी शर्ती घालून समज देण्यात आली आहे. त्यामुळे आरोपीची कोठडीची कोणतीही आवश्यकता नाही. आरोपी याच जिल्हातील रहिवासी असून त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता या जिल्हायात आहे. त्यामुळे आरोपी फरार होण्याची शक्यता नाही. तपासकाम पुर्ण

झालेले आहे. सबब, आरोपी जामीन मिळणेस पात्र ठरतो. परिणामी खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

## – आदेश –

१. सदरचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. असे आदेशित करणेत येत आहे की, **अर्जदार/आरोपी क्र.१ श्री.संदिप गणपत तानवडे व आरोपी क्र.२ श्री.गणपत भाऊ तानवडे** दोन्ही रा. कोकीसरे–नारकरवाडी, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग यांना वैभववाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध ) अधिनियम २०१० चे कलम ४ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२१(१),१३२,३५२,३(५) या शिक्षापात्र गुन्हयामध्ये अटक झाल्यास त्यांना प्रत्येकी रक्कम रुपये ५०,०००/–(रक्कम रुपये पन्नास हजार मात्र/–) चा वैयक्तिक जातमुचलका आणि तेवढयाच रक्कमेच्या ऐपतीचा जामीन दिल्यास खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून जामीनावर मुक्त करणेत यावे.

अ) अर्जदार/आरोपी यांनी साक्षीदारांवर कोणत्या स्वरुपाचा दबाव येईल असे कृत्य करु नये आणि पुराव्यात ढवळाढवळ करु नये.

ब) आरोपी याने त्याच्या कुटुंबातील सदस्य वगळता जवळच्या दोन नातेवाईकांचे पत्ते आणि मोबाईल नंबर दयावे.

क) आरोपी त्यांच्या वास्तव्याच्या कायम आणि तात्पुरत्या पत्त्यामध्ये बदल झाल्यास त्याबाबत कागदोपत्री पुरावा देवून न्यायालयास कळविणेत यावे.

२. आरोपीने कोणताही गुन्हा करु नये.

३. वर नमूद कोणत्याही अटी शर्तींचा आरोपींनी भंग केल्यास त्यास अधीन राहून जामीन रद्द करणेत येईल .

Digitally signed by SANTOSH TRIBHUWONNATH TRIPATHI
Date: 2026.07.21 16:28:13 +0530

सिंधुदुर्ग –ओरोस
दि.२१/०७/२०२६

( एस.टी.त्रिपाठी )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग –ओरोस.